# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५)

(क) : **(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५, बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५, गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५ व शुक्रवार ७ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव ) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विक्रम काळे, हेमंत पाटील, सदाशिव खोत, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री परिणय फुके, शिवाजीराव गर्जे, सतिश चव्हाण, प्रसाद लाड, पंकज भुजबळ, श्रीकांत भारतीय, श्रीमती भावना गवळी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, वसंत खंडेलवाल, किशोर दराडे, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, ज्ञानेश्वर म्हात्रे, अमरीशभाई पटेल, राजहंस सिंह, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतक-यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेवून आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबवून पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी

अग्रिम प्रत

विकसित करण्यात आली असणे, “मागेल त्याला शेततळे” या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रीब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतकऱ्यांना सिंचनासाठी “मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना” जाहिर केली असणे, या शासनाने “मागेल त्याला सौरकृषी पंप योजना” सुरु केली असल्याने शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता “मातोश्री पाणंद रस्ते योजना” शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी “महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना” सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतकऱ्यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी

प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सुत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतक-यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत ॲप' हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजु महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्याच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात

शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख)** : **(गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५ व शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** ) —

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"सरकारच्या फसव्या योजना आणि दिशाहीन धोरणे यामुळे राज्यातील शेतकरी, मजूर, महिला आणि युवक संकटात असणे, ग्रामीण आणि आदिवासी भागांत अद्यापही मूलभूत आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, अनेक ठिकाणी जिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, औषधे आणि उपकरणांचा अभाव असणे, ठाणे आणि पुण्यातील मनोरुग्णालयांतील परिस्थिती अत्यंत दयनीय असणे, सरकारी रुग्णालयांत अस्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांची हजारो पदे रिक्त असून पदभरती अभावी रुग्णसेवा प्रभावित होणे, सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवणे कठीण झाले असून खासगी वैद्यकीय शिक्षण अतिशय महाग झालेले असूनही शासनाने सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढविण्या ऐवजी नविन खाजगी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास दिलेली परवानगी, शासकीय रुग्णालयांना औषध पुरवठा करण्याचे कंत्राट आपल्या जवळील कंत्राटदारास मिळण्याच्या दृष्टीने हाफकिन महामंडळासोबत केलेला करार रद्द केलेला असणे, तथापि, सदरहू कंत्राटदाराकडून औषध पुरवठा करण्यास होत असलेला विलंब, त्यामुळे अनेक रुग्ण उपचारा अभावी मृत्युला सामोरे जावे लागणे, सरकारने अनेक कर्जमाफी योजना घोषित केल्या पण सर्वांना प्रत्यक्ष लाभ मिळाला नसणे, विमा कंपन्या शेतकऱ्यांना भरपाई देत नसून शासन देखील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करीत असणे, शेतीसाठी अपुरा वीजपुरवठा आणि सिंचन योजनांमध्ये भ्रष्टाचार झाल्याने शेतीला पाणी मिळत नसणे, शेतमालाला योग्य हमीभाव मिळत नसणे, बोगस

खते व बियाणे विक्री करणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात होणारे नुकसान, दलाल शेतकऱ्यांची लूट करीत असणे, कृषी संकटामुळे शेतमजूर आणि शेतकरी दोघेही बेरोजगार झालेले असणे, कृषी विभागात निविष्ठा खरेदी व विविध कामांमध्ये भ्रष्टाचार झाला असून त्यावर कारवाई करण्यास राज्य शासनाकडून होत असलेली दिरंगाई, विद्यमान व माजी मंत्र्यांच्या अखत्यारित असलेल्या खात्यातील विविध कामे रद्द करण्याचा घेतलेला निर्णय, परिणामी यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे समोरे येणे, चुकीचे निर्णय व नविन धोरणे यामुळे राज्यावर कर्जाचा वाढलेला बोजा, प्री-पेड मीटर लावण्यास नागरिकांचा विरोध असताही महावितरण कडून मीटर लावण्याची होत असलेली सक्ती, नव्या मीटरसाठी अतिरिक्त शुल्क आकारणे, महावितरणच्या ३२९ उप केंद्रांचे खासगीकरण करण्याचा सुरु असलेला प्रयत्न, शासनाच्या महत्त्वाच्या विभागांमध्ये हजारो जागा रिक्त असून, भरती प्रक्रिया लांबणीवर पडल्यामुळे अनेक उमेदवार शासकीय नोकरीपासून वंचित राहणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक परिक्षांचा निकाल न लागणे, शासनाने काही खाजगी संस्थाचा फायदा होण्याच्या दृष्टीने कंत्राटी पध्दतीने कर्मचारी भरण्याचा घेतलेला निर्णय, बेरोजगार तरुणांसाठी ठोस धोरणे नसणे, राज्यातील इतर मागास वर्ग, भटक्या जाती व विमुक्त जाती, अनुसूचित जाती, जमाती व खुल्या प्रवर्गाच्या सारथी, बार्टी, महाज्योती सारख्या योजनांच्या अनुदान वितरणास होत असलेला विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असलेला परिणाम, शक्तीपीठ महामार्गास जनतेचा विरोध असूनही शासनाचा सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी सुरु असलेला प्रयत्न, मुंबई-गोवा महामार्गाचे गत १२-१५ वर्षांपासून महामार्गाचे काम पूर्ण झालेले नसल्याने वाहतूक कोंडी आणि अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली असणे, महामार्गाच्या कामासाठी आवश्यक निधी वेळेवर मंजूर होत नसणे, अनेकवेळा कंत्राटदार बदलण्यात येवूनही दर्जाहीन काम सुरु असणे, पावसाळ्यात महामार्गावर पूरस्थिती निर्माण होत असूनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडेन १६ हजार कोटी रुपयांच्या विविध योजना राबविण्यात येणे, उक्त योजनेतून मिळणारी मदत थेट लाभार्थ्यांना मिळत नसून अन्य व्यक्तींना मिळणे, त्यामुळे अनेक कामगार योजनेतून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिले असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून सदरहू योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

## दुपारी १२.०० वाजता

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **संसदीय कार्य मंत्री** : विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात सन २०२४ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १६ डिसेंबर, २०२४ ते दिनांक २१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण २२ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ४१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह, विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **वने मंत्री** : "महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील."

(३) **पशुसंवर्धन** : "महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील."

(४) **वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील."

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (५)] —**

(१) **श्री.किशोर दराडे, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"प्रशासन अधिकारी, नाशिक महानगरपालिका, शिक्षण विभाग यांनी जिल्हा परिषद व इतर आस्थापनावरून ५२ प्राथमिक शिक्षकांना महानगरपालिका, नाशिक मध्ये एकतर्फी सामावून घेतलेले असणे, सामावून घेत असताना बिंदू नामावली व रिक्त पदे यांचा कोणताही विचार केलेला नसणे, ३९ जागा रिक्त असतांना सरळ सेवा भरतीने अथवा अनुसूचित जाती संवर्गातील आंतर जिल्हा भरणे आवश्यक असतांना स्वत:च्या आर्थिक लाभासाठी इतर संवर्गातील शिक्षकांना बदलीने घेतले असणे, नाशिक महानगरपालिकेमध्ये केंद्र प्रमुख पदांचा कोणताही आकृतीबंद मंजूर नसतांना अथवा पद अस्तित्वात नसतांना मर्जीतील शिक्षकांना स्वत:च्या फायद्यासाठी केंद्र प्रमुख पदी नेमणूक करणे, तसेच १४ ते १५ शिक्षकांना २४ केंद्राच्या शाळा तपासणीच्या नांवाखाली तपासणी करणे व शिक्षकांची आर्थिक पिळवणूक करणे, शिक्षकांची वैद्यकीय देयके सादर करण्यासाठी प्रशासन अधिकारी यांच्याकडून शिक्षकांची आर्थिक पिळवणूक करणे, तसेच महानगरपालिका शाळा क्र.३५, शाळा क्र.४४, शाळा क्र.५५ या शाळांमध्ये मुख्याध्यापक पद नसतांना मुख्याध्यापक पदी पदस्थापना देणे, तसेच शिक्षकांच्या हक्काची अर्जित रजा, वैद्यकीय रजा मंजूरीसाठी आर्थिक शोषण करणे, तसेच शिक्षकांच्या अंतर्गत बदल्या निव्वळ तोंडी आदेशान्वये व शाळेतून शेरे बुकात नोंद करून बेकायदेशीर बदल्या केलेल्या असणे, तरी प्रशासन अधिकारी यांचे निलंबन करण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री सत्यजीत तांबे,** अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत

अग्रिम प्रत

आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.प्रसाद लाड, पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईसह राज्यातील पुणे, नाशिक, ठाणेसह सर्वच मोठ्या व लहान शहरांतील फेरीवाल्यांचा प्रश्न हा अत्यंत संवेदनशील-वादग्रस्त बनत असणे, एका बाजूला फेरीवाले स्वतःच्या रोजीरोटीसाठी रस्त्यावर व्यवसाय करत असणे, तर अधिकृत परवाने घेऊन मोठ्या भांडवलावर व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांना त्यांच्या व्यवसायावर फेरीवाल्यामुळे परिणाम होत असल्याची भावना बनली असणे, दुकानदारांना भाडे, कर, वीजबिल, परवाने, विविध कर अशा अनेक खर्चांचा सामना करत असणे, तर अनेक फेरीवाले अनधिकृतरीत्या व्यवसाय करून कमी दरात माल विकत असणे, त्यामुळे दुकानदारांचे तीव्र नुकसान होत असणे, फेरीवाल्यांमुळे फुटपाथ आणि रस्ते व्यापले जाऊन ग्राहक दुकानांपर्यंत सहज पोहोचू शकत नसणे, याकरीता शहर फेरीवाला झोन तयार करणे,अधिकृत दुकानदार महापालिका तसेच शासनाला नियमितपणे कर भरूनही त्यांना मूलभूत सुविधा मिळत नसणे, रस्त्यांवरील अतिक्रमण टाळण्यासाठी फेरीवाल्यांसाठी निश्चित क्षेत्रे तयार करणे, दादर येथील व्यापारी संघाने वेळोवेळी महानगरपालिका आणि पोलिस आयुक्तांना निवेदने देऊन अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईची मागणी केलेली असणे, महाराष्ट्र पथ विक्रेता कायद्याची अंमलबजावणी करणे, यासंदर्भात महाराष्ट्र हॉकर्स फेडरेशन संलग्न नॅशनल हॉकर्स फेडरेशन, मुंबई यांनी मा.मुख्यमंत्री, अप्पर मुख्य सचिव, नगरविकास विभाग व पालिका आयुक्त, महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असणे, फेरीवाले गत १० वर्षापासून त्यांच्या हक्का पासून वंचित राहिले असणे, यासाठी सर्वेक्षण करुन सुमारे साडेतीन लाख फेरीवाल्यांमधून ३२ हजार ४०७ फेरीवाल अधिकृत असल्याचे जाहिर केलेले असून त्यांचे पुनर्वसन अद्यापही करण्यात आलेले नसल्याची बाब माहे मार्च, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेले असणे,या पात्र फेरीवाल्यांचे भवितव्य मुंबई फेरीवाला समितीच्या निर्णयावर अवलंबून असणे, सदर फेरीवाल्यांचे मुंबई शहर व उपनगरांमध्ये ४०४ मार्गावर पुनर्वसन करण्याचे ठरविण्यात आलेले असूनही अद्यापपावेतो हा निर्णय कागदावरच असल्यामुळे प्रत्येक रस्त्यावर फेरीवाला दिसून येत असणे, परवानाधारक फेरीवाल्यांनाच व्यवसायाची परवानगी देणे आणि अनधिकृत

फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे असणे, याकरीता शहर फेरीवाला समिती गठीत करणे तसेच फेरीवाल्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्याबाबतचे निर्देश मा.उच्च न्यायालय यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये देणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी फेरीवाले व स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, मुंबईसह राज्यातील सर्व फेरीवाल्यांचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.राजहंस सिंह**, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील काही झोपडीवासियांनी सन २००१ मध्ये वन खात्याच्या नियमानुसार सन १९९५ पूर्वीचे म्हणून ७,००० रुपये भरलेले असणे, अंदाजे १५ हजार रहिवासी यांनी सन २००८ मध्ये नियमानुसार रुपये ७,००० भरले, परंतु आज त्यांना १५ वर्षे होऊन सुद्धा अद्यापपर्यंत घरे मिळाली नसणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आंबेडकर नगर, गौतम नगर, सिद्धार्थ नगर, संजय नगर, कालीमाता नगर, आपापाडा, जामऋषी नगर, बंजारी पाडा, शांती नगर, पिंपरी पाडा, मातंग गड, सावित्रीबाई फुले नगर, क्रांती नगर, दामू नगर पासून मागाठाणे पर्यंत सदर वन विभागामध्ये असणे, या उर्वरित झोपडीवासीयांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांचेही पुनर्वसन करण्याची विनंती केली असणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील वन खात्याच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या पात्र अंदाजे १५ हजार कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.राजेश राठोड**, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील बंजारा समाजाने अनेक प्रलंबित मागण्या शासनाकडे मांडल्या असून त्यात प्रामुख्याने नॉन-क्रिमीलर, पदोन्नतीमधील आरक्षण, वनार्टी (वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था), वसंतराव नाईक महामंडळातून कर्ज वितरण, कर्नाटकच्या धर्तीवर तांडा डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, संविधान सुची ८ नुसार गारबोली भाषेला राज भाषेचा दर्जा देण्यात

अप्रकाशित

याव्यात, इत्यादी मागण्या करण्यात येणे, यावेळी शासनाकडून या मागण्यांवर आश्वासने देण्यात येणे, तसेच पोहरादेवी गडाचा तीर्थक्षेत्र धर्तीवर विकास करण्याचे आश्वासन देणे, नवी मुंबई येथे बंजारा भवन उभारण्याचे आश्वासन देणे, राज्य नंगारा प्राधिकरण स्थापन करणे, वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेतून प्रत्येक तांडयावर पाणी, रस्ते आदी मुलभूत सुविधांसह अंगणवाडी, शाळा, दवाखाने उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन देणे, परंतु या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत अद्याप शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील बंजारा समाजात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री सदाशिव खोत,** प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, वि.प.स.पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली यांचेकडे सन २०१५ ते २०२१ या कालावधीतील संचालक मंडळाने केलेल्या कामकाजाबाबत वेळोवेळी तक्रारी दाखल केलेल्या असणे, या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक यांचेकडील वेळोवेळीच्या आदेशाने तक्रारीमधील चौकशीकामी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था लेखा ) कोल्हापूर विभाग (परीक्षण, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली ५ अधिकाऱ्यांची समिती नेमलेली असणे, सदर समितीने चौकशी करुन त्यांचा अहवाल दिनांक १६ जून, २०२३ रोजी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केलेला असणे, सदर अहवालानुसार बँकेच्या कामकाजात अपहार, गैरव्यवहार तसेच अनियमीतता व बोगस कर्ज वाटप झाल्याचे निदर्शनास आलेले असणे, प्रत्यक्ष प्रशासकीय अहवालानुसार उघड झालेला अपहार, गैरव्यवहार व अनियमितता ही कलम ८३ अन्वये झालेल्या चौकशीमध्ये सक्षमपणे मांडलेली नाही असे दिसून येत अचसणे, बँकेचा सखोल चौकशी सहकार खात्याकडून व्हावी, विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमावा, विद्यमान तसेच मागील संचालक मंडळावर गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करून त्यांची वसुली करावी या मागण्या घेऊन आंदोलन होत असणे, अशा बँकेमध्ये येवढ्या मोठ्या

अग्रिम प्रत

प्रमाणावर अपहार, गैरव्यवहार होत असल्याने ठेवीदारांच्या ठेवीस व त्यांच्या विश्वासास तडा जाण्याची शक्यता असणे, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेची चौकशी पारदर्शकपणे होणेसाठी सध्याचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.योगेश टिळेकर**, **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सिंहगड सिटी स्कूल, कोंढवा बुद्रुक, पुणे ही शाळा अनधिकृत इमारतीत सुरू असणे, पुणे महानगरपालिका कार्यकारी अभियंता यांनी शैक्षणिक इमारतीकरीता पोहोच रस्ता उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २५८ अन्वये नोटीस बजावणे, शाळा चालक यांनी शाळेच्या इमारतीस जाणे येण्यासाठी C2-4 या आरक्षणामधून रस्ता दर्शवून (UDCPR 2020) मधील कलम ११ मधील Accommodation Reservation चे तरतूदीनुसार आरक्षण विकसित करणार असे कळविणे, परंतु याबाबत दाखल प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे व नकाशा दाखल न केल्याचे कार्यकारी अभियंता यांनी कळविणे, शैक्षणिक इमारतीचे भोगवटा पत्र घेण्यात आलेले नसून इमारतीचा विना भोगवटा वापर सुरु असणे, याबाबत कार्यकारी अभियंता यांनी पत्रान्वये कळविणे, शाळा चालकाने नकाशामध्ये पोहोच रस्ता उत्तर पूर्व दिशेस दर्शविलेला असणे, परंतु सद्य:स्थितीत हा रस्ता जागेवर उपलब्ध नाही अथवा विकसीत करण्यात आलेला नसणे, त्यामुळे त्यांनी प्रस्ताव मान्य करतेवेळी पोहोच रस्त्याबाबत नकाशावर विपर्यास्त माहिती दर्शवून पुणे महानगरपालिकेची दिशाभूल करुन नकाशे मंजूर करुन घेतल्याचे सिद्ध होणे, यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २५८ अन्वये पुणे महानगरपालिकेने बांधकाम परवानगी रद्द केलेली असतानाही अनधिकृत इमारतीमध्ये शाळा सुरू ठेवून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणे, यासाठी सदर शाळेवर तातडीची कारवाई करून संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.अरुण लाड,** श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अशोक उर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, सतेज उर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कर्नाटक राज्य सरकारने अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याबाबत निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास येत असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ मध्ये निदर्शनास आलेले असणे, अलमट्टी धरणाची उंची सध्याच्या १९.६० मीटर असून ती ५२४ मीटर करण्याचे कर्नाटक सरकारचे प्रयोजन असणे, तथापि त्यामुळे धरणाच्या बॅकवॉटरमुळे सांगली, कोल्हापूर व सातारा हे जिल्हे पावसाळ्यात जलमय होऊन शेती आणि गावे उध्वस्त होण्याचा असलेला धोका, यापूर्वी देखील असेच सन २००४, २०१९, २०२१ व २०२४ असे चार वर्षे अलमट्टी धरणामुळे या सर्व जिल्ह्यात महापूर येऊन गावेच्या गावे ठप्प होत असल्याचे आढळून येणे, याबाबत वास्तविकत: मा.सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती असताना कर्नाटक सरकारने तसा निर्णय घेणे हे चुकीचे ठरते, त्यामुळे राज्याच्या मंत्रीमंडळात याबाबत चर्चा होऊन जलसंपदा मंत्री महोदयांनी केंद्रीय जलसंपदा मंत्री यांची भेट घेऊन राज्य शासनाचा अलमट्टी धरणाचे वाढीबाबत शासनाचा तीव्र विरोध असल्याचे केंद्रीय मंत्री महोदयांना सांगणार असल्याचेही निदर्शनास येणे, सदर भेटीत जलसंपदा मंत्री व केंद्रीय जलसंपदा मंत्री महोदयांशी झालेली चर्चा व त्याबाबत राज्य शासनाने पुढे कोणती कार्यवाही करणे अपेक्षित असणे, याबाबत खुलासा होण्याची गरज व यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **सर्वश्री जयंत आसगावकर,** प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, सदाशिव खोत, सतेज ऊर्फ बंटी पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र शासनाकडून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) राज्यात लागू होणे, या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्राध्यापकांसह

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे, आज राज्यातील सार्वजनिक ११ विद्यापीठे आणि १ हजार १७२ अनुदानित महाविद्यालयांमध्ये ३६ हजार ७६३ प्राध्यापकांची पदे मंजूर असणे, त्यातील २१ हजार २३६ पदांवर प्राध्यापक कार्यरत असून तब्बल १२ हजार ५२७ इतक्या जागा रिक्त होणे, ही पदे रिक्त असल्यामुळे 'एनईपी'ची अंमबाजावणी करताना मोठ्या अडचणींना सामना करावा लागणे, तसेच 'नॅक' ला सामोरे जाताना महाविद्यालयांना अनेक समस्या जाणवणे, उच्च शिक्षण विभागाने रिक्त पदांपैकी ४ हजार ३०० पदांच्या भरतीच्या मान्यतेसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करणे, प्राध्यापक भरतीवर घातलेली बंदी आणि वयोमानानुसार निवृत्त होणारे प्राध्यापक यामुळे प्राध्यापक पदांच्या रिक्त संख्येत दरवर्षी भर पडत जाणे, महाविद्यालयातील ४० ते ५० टक्के प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होणे, सेट, नेट व पीएचडी पात्रधारकांच्या बेरोजगारीत वाढ होत असणे, त्यामुळे प्राध्यापक भरती प्रक्रियेचा शासन निर्णय तात्काळ जाहीर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.अमित गोरखे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना गोर-गरीब लोकांना नोकऱ्यांची संधी उपलब्ध करून देत असताना औद्योगिक क्षेत्राच्या कामगारांना टाटा मोटर्स, बजाज ऑटो, थरमॅक्स, किर्लोस्कर अश्या महाराष्ट्रातील अनेक नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी करत असताना कामगारांना लांबून प्रवास करावा लागणे, अश्या वेळेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्रात रहिवाशी भूखंड विकसित करून त्यांच्या घरांच्या समस्या सोडवल्या परंतु कामगारांनी कर्ज काढून, शेती विकून, घरच्या महिलांचे दागिने विकून व दागिने गहाण ठेऊन गृहनिर्माण सोसायटीमध्ये घरे घेण्यात येणे, परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे अनेक गृहनिर्माण सोसायट्या या बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेऊ शकल्या नसणे, अनेक वर्ष सदरचा दाखला न घेतल्यामुळे त्याचा दंड वाढत गेल्याने परिस्थिती बिकट असणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक सोसायट्या, धर्मादाय अंतर्गत येणाऱ्या संस्था, छोटे भूखंडधारक ज्यांनी पूर्णत्वाचा दाखला घेतलेला

अप्रमाणित प्रत

नाही अशा सर्वांना सरसकट बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेण्यासाठी येणारी रक्कम व त्याच्यावरचा दंड १००% माफ करून सदरचा पूर्णत्वाचा दाखला घेण्याकरिता २ वर्षाची मुदत देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **डॉ.परिणय फुके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोसेखुर्द प्रकल्पातील प्रकल्पबाधित असून विविध विभागांमध्ये महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा २०२३-२४ मधून निवड झालेली असणे, त्यांची नियुक्ती प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाच्या कोट्यातून असल्यामुळे त्यांचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र पडताळणी करण्याकरता जिल्हाधिकारी पुनर्वसन विभाग कार्यालय भंडारा व नागपूर येथे पाठवण्यात आले असणे, त्यांच्याकडील चौकशी अहवालामध्ये त्यांनी २.९० लक्ष रुपये नोकरी ऐवजी एक मुक्त अनुदानाचा लाभ घेतला असल्याचे दिसून येत असणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र व नोकरी ऐवजी २.९० लक्ष हे दोन्ही लाभ पुनर्वसन विभाग नागपूर व भंडाराकडून घेण्यात आले असून दोन्ही ऐवजी कोणत्याही एक बाबी घ्यायचा असेल तर त्यांनी शासनाकडून मिळालेले रु.२.९० लक्ष रक्कम शासनाकडे जमा करण्यास तयार असल्यामुळे नोकरी विषयक प्रमाणपत्र पडताळणी मिळण्याबाबत विनंती केली असणे, गोसेखुर्द प्रकल्पातील प्रकल्प बाधित, यांच्याकडून रुपये २.९० शासनाकडील जमा करून त्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र पडताळणी देण्याबाचत शासनाने करावयाची योग्य ती कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## -मध्यंतर-

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम २२८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी."

अप्रकाशित

**सात : सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस)**

**आठ : शासकीय विधेयक –**

**विधानसभेने सुधारणेसह संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५."

---

**नऊ : सर्वश्री प्रविण दरेकर**, हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, निरंजन डावखरे, किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेवून महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोट्या शहरांमध्ये स्टार्टअपची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअपनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअपचे देशातील पहिल्या क्रमांकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मलःनिस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने

विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचे प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतुची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणाऱ्या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणाऱ्या पोलीस कर्मचा-यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने दुर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणा-या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प डयुटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे,

झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समुह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या सहा पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखडयाच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहराचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतुक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री विक्रम काळे,** शिवाजीराव गर्जे, सतिश चव्हाण, **वि.प.स.**

"**राज्यातील अडीच लाखांपेक्षा जास्त रिक्त पदे भरताना कंत्राटी पद्धत रद्द करण्याबाबत**" या विषयावरील ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.विक्रांत पाटील,** ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, **वि.प.स.**

**"अंधेरी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अपात्र झोपडपट्टीधारकांना वितरीत केलेल्या सदनिका प्राधिकरणाने ताब्यात घेतल्या नसल्याबाबत"** या विषयावरील श्री. विक्रांत पाटील, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७१ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : १० मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद